# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-31.05.2026** **वार- रविवार**

---

**अहिल्यादेवीहोळकरजयंती**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त आज राज्यात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी या अहिल्याबाईंच्या जन्मस्थानी जाऊन त्यांना अभिवादन केलं.

**रसायू**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करून आयुर्वेदशास्त्राच्या संशोधनाचा मार्ग मोकळा केला; असं प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी आज पुण्यात केलं. रसायू लाईफ सायन्सेस या संस्थेच्या नूतन वास्तूच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. खासदार मेधा कुलकर्णी यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

**भीमाशंकर**

गेल्या पाच महिन्यांपासून बंद असलेलं श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर येत्या 15 जूनपासून भाविकांसाठी पुन्हा खुलं होणार आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात विकास कामं केली जात असल्यानं मंदिर दर्शनासाठी बंद होतं. आता 15 जूनपासून सकाळी 7 ते 11 या वेळेत भाविकांना दर्शन घेता येईल. यासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य असेल, असं जिल्हा प्रशासनानं म्हटलं आहे.

**विषारीदारूप्रकरण**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्यायल्याने आतापर्यंत 24 जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य सरकारने याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला आहे. तपासासाठी सीआयडीची पाच पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेऊन पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातल्या काही अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित

करण्यात आलं आहे. प्राथमिक तपासानुसार, पुण्यात तयार केलेल्या विषारी दारूमध्ये मिथेनॉलचा वापर झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विषारी दारूमुळे अनेकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी मोहीम राबवली. या कारवाईत 4 हजार 480 लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली असून दारू निर्मितीसाठी साठवून ठेवलेलं 42 हजार लिटर घातक रसायन नष्ट करण्यात आलं आहे. या प्रकरणी आतापर्यंत 52 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पुणे ग्रामीण भागातही अवैध हातभट्ट्यांवर कारवाई सुरू असून मुळशी तालुक्यातील विविध गावांमध्ये 10 ते 12 हातभट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत.

या घटनेचे पडसाद राज्यभर उमटत असून नागपूरसह विविध जिल्ह्यातही अवैध दारूविरोधात मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

**<u>गर्भलिंगतपास</u>**

दौंड तालुक्यातील केडगाव इथं उघडकीला आलेल्या बेकायदा गर्भलिंगनिदान प्रकरणी यवत पोलिसांनी आणखी दोन डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी याच्या चौकशीतून अनेक महत्त्वाच्या बाबी समोर आल्या असून, या प्रकरणात आतापर्यंत पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**<u>ई-बस</u>**

राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागात 105 इलेक्ट्रिक बस समाविष्ट केल्या आहेत; त्यामुळे दररोज साडे दहा ते अकरा हजार लिटर डिझेलची बचत होत असल्याची माहिती विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी दिली. इलेक्ट्रिक बसच्या वापरामुळे महामंडळाच्या इंधन खर्चात लक्षणीय घट होत असून पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागत असल्याचं सिया यांनी म्हटलं आहे.

**<u>तंबाखूविरोधीदिवस</u>**

तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या धोक्यांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी आज 'जागतिक तंबाखू विरोधी दिवस' पाळला जात आहे. आकर्षणाचा मुखवटा उतरवू-निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनावर मात करू', ही यंदाच्या या दिवसाची संकल्पना आहे.

**<u>कलाप्रदर्शन</u>**

राज्यातल्या 65 चित्रकारांच्या कलाकृतींचं प्रदर्शन आजपासून पुण्याच्या बालगंधर्व कलादालनात सुरू झालं. यात 20 बालकलाकारांचा समावेश आहे. नवकार आर्ट फाऊंडेशननं आयोजित केलेलं हे प्रदर्शन येत्या 2 जूनपर्यंत सकाळी 10 ते संध्याकाळी 7 या वेळेत सर्वांसाठी खुलं आहे.

**सीएमए**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या 67 व्या वर्धापनदिनानिमित्त पुणे शाखेच्या वतीने पहिल्यांदाच कौटुंबिक स्नेहमेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. 'आय सी एम ए आय चे राष्ट्रीय उपाध्यक्ष नीरज जोशी, डॉ. संजय भार्गवे, यांच्यासह सीएमए सदस्य, त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात हास्ययोग प्रशिक्षक मकरंद टिल्लू यांचं ‘हसण्यासाठी जगा, जगण्यासाठी हसा’ या विषयावर व्याख्यान झालं.

**हवामान**

पुण्यात आज कमाल 37 आणि किमान 25 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस तापमानची नोंद झाली. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**